**सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.**
**शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.**
**Ph.No :** (0721) 2573027, 2572577
**Email:** roamravati@dtemaharashtra.gov.in
**Website:** www.jdroamt.org
**Fax No:** (0721) 2577913

क्रमांक :- विकाअ/शिक्षण /२०२४/ 3365
दिनांक :- 14 NOV 2024

**प्रति,**

**प्राचार्य,**
सर्व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, या शिखर परिषदेच्या अधिपत्याखालील
अभ्यासक्रमाच्या सर्व विद्यमान/प्रस्तावित नविन संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता विद्यमान संस्थेतील AICTE नवी दिल्ली या शिखर संस्थेच्या अधिपत्याखालील अभ्यासक्रमांच्या व प्रस्तावित नवीन संस्थेच्या मान्यता प्रक्रियेबाबत.**

**संदर्भ :-** १. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक :- २/एनजीसी/मान्यता/एआयसीटीई/ २०२५/९३५ दिनांक १२/११/२०२४.
२. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई पत्र क्रमांक :- २/एनजीसी/नवीन संस्था / २०२५/९३८ दिनांक १२/११/२०२४.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी अधिसुचना/जाहीर सुचना/परिपत्रकाव्दारे नवीन संस्था/ अभ्यासक्रम इत्यादीच्या मान्यता प्रक्रियेसंदर्भातील अटी व शर्ती, मानके व मान्यता प्रक्रियेचे वेळापत्रक प्रसिध्द केलेले आहे. व त्या सबंधीचे Approval Process Handbook प्रसिध्द केले आहे. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या अधिपत्याखाली येणा-या संस्थांमधील अभ्यासक्रमांच्या व प्रस्तावित नवीन संस्थेच्या मान्यता प्रक्रियेबाबत प्राधिकरणाच्या आवश्यकतेनुसार शासनाच्या ना-हरकत प्रमाणपत्र / शासन मान्यतेकरिता सोबत जोडलेल्या मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांच्या पत्रामध्ये नमुद ८ बाबींकरीता अर्ज सादर करण्यास कळविलेले आहे (सोबत मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे संदर्भ १ च २ चे पत्र जोडलेले आहे). कृपया त्याचे अवलोकन करुन त्यामध्ये दिलेल्या निर्देशाप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करावी.

तसेच याबाबत आपणास कळविण्यात येते की, ज्या विद्यमान अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली या शिखर परिषदेच्या अधिपत्याखालील प्रस्तावित नवीन संस्था व विद्यमान संस्था संदर्भिय अधिसुचना/जाहीर सुचना/परिपत्रकानुसार AICTE नवी दिल्ली यांचेकडे अर्ज सादर करणार आहेत. अश्या संस्थांनी शासनाची मान्यता/शासनाचे ना हरकत प्रमाणपत्रासाठीचे प्रस्ताव दिनांक २२/२/२०१८ च्या शासन

निर्णयान्वये निर्धारीत केलेले नोंदणी शुल्क भरलेल्या पावतीसह तात्काळ या कार्यालयास सादर करावे विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेले प्रस्ताव कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाही, याची गंभिरतेने नोंद घ्यावी.

तसेच आपणास कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भिय १ चे पत्रामध्ये नमुद ८ बाबीं व्यतिरिक्त इतर प्रकरणी (उदा. प्रवेशक्षमता वाढ/घट इत्यादी) दिनांक २२/२/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्धारीत केलेले नोंदणी शुल्क सबंधिताच्या नावे (राष्ट्रीयकृत बँके) डी.डी. काढुन प्रस्ताव या कार्यालयाकडे जमा करावी.

तसेच आपणास कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी निर्धारीत केलेल्या मानकांप्रमाणे संस्थेकडे पुर्णपणे सद्यःस्थितीत वापरायोग्य सोईसुविधा असतील तसेच समुचीत प्राधिकरणाने निर्धारीत केलेली व सक्षम प्राधिका-यांनी निर्गमित केलेली प्रमाणपत्रे उपलब्ध असतील तरच संस्थानी आपले प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर करावेत. तसचे शासनाची मान्यता/शासनाचे ना हरकत प्रमाणपत्रासाठी प्रस्ताव सादर करण्यास विलंब झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी सबंधित संस्थाची राहील, याची कटाक्षाने नोंद घ्यावी.

**सहपत्र :- वरील प्रमाणे.**

**(मनोज म. अंधारे)**
**प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,**
**अमरावती.**

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४६५/४७५/४९२/४४२/४४३
ई-मेल – desk2@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

परिपत्रक :
क्रमांक: २/एनजीसी/मान्यता/एआयसीटीई /२०२५ ८३५ दिनांक : 12 NOV 2024

प्रति,
प्राचार्य,
AICTE या शिखर संस्थेच्या अधिपत्याखालील
अभ्यासक्रमाच्या सर्व विद्यमान / प्रस्तावित नवीन संस्था,
महाराष्ट्र राज्य

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीताच्या विद्यमान संस्थेतील AICTE नवी दिल्ली या शिखर संस्थेच्या अधिपत्याखालील अभ्यासक्रमांच्या व प्रस्तावित नवीन संस्थेच्या मान्यता प्रक्रियेबाबत.....

संदर्भ: अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद नवी दिल्ली यांच्या शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिताच्या मान्यता प्रक्रिये संदर्भातील अधिसूचना / जाहीर सूचना / परिपत्रके

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद नवी दिल्ली यांनी अधिसूचना / जाहीर सूचना / परिपत्रका द्वारे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीताच्या नवीन संस्था/अभ्यासक्रम इत्यादीच्या मान्यता प्रक्रियेसंदर्भातील अटी, शर्ती, मानके व मान्यता प्रक्रियेचे वेळापत्रक प्रसिद्ध केले आहे व त्या संबंधीचे Approval Process Handbook प्रसिद्ध केले आहे. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या अधिपत्याखाली येणा-या संस्थांमधील अभ्यासक्रमांच्या व प्रस्तावित नवीन संस्थेच्या मान्यता प्रक्रियेबाबत प्राधिकरणाच्या आवश्यकतेनुसार शासनाच्या ना हरकत प्रमाणपत्र /शासन मान्यतेकरिता खालील प्रमाणे प्रस्ताव संबंधित विभागीय कार्यालयांकडे सादर करण्यात यावेत.

| अ.क्र. | अर्जाचा प्रकार |
|---|---|
| १ | नविन तांत्रिक संस्था सुरू [Setting up a new Technical Institution] |
| २ | संस्था बंद करून तेथे नवीन व्यावसायिक अभ्यासक्रमाची संस्था सुरू करणे<br>[Institution applied for Closure of the Institution for starting of a new Technical Institution in the same premises in the same year] |
| ३ | पदविका पातळीच्या संस्थेचे पदवी पातळीच्या संस्थेत रुपांतरण आणि त्याउलट करणे.<br>[Conversion of Diploma Level into Degree Level and vice-versa] |
| ४ | विद्यमान संस्थेत नवीन विद्याशाखा (Programme) / स्तर (Level) सुरू करणे.<br>[To start New Programme / Level in the existing Institutions] |
| ५ | साईट / लोकेशन मध्ये बदल करणे.[ Change of Site / Location] |
| ६ | संस्था बंद करणे [Closure of the Institution] |
| ७ | महिला संस्थेचे को-एज्युकेशन मध्ये परिवर्तन व त्याउलट<br>[Conversion of Women's Institution into Co-ed Institution and vice-versa] |

शिक्षण
१३/११/२४

| | | |
|---|---|---|
| ८ | ट्रस्ट / सोसायटी / कंपनीच्या नावात/ पत्त्यात बदल करणे<br>[Change in the Name / Address of the Trust / Society / Company] | |

राज्यातील विद्यमान AICTE शिखर संस्थेच्या अधिपत्याखालील प्रस्तावित नवीन संस्था व विद्यमान संस्थांपैकी ज्या संस्था संदर्भीय अधिसूचना / जाहीर सूचना / परिपत्रकानुसार AICTE नवी दिल्ली यांचेकडे अर्ज करणार आहेत, अशा संस्थांनी शासनाची मान्यता/ शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्रासाठीचा प्रस्ताव दि. २२.०२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये निर्धारीत केलेले नोंदणी शुल्क भरलेल्या पावतीसह तात्काळ संबंधित सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे सादर करावा. तसेच उपरोक्त नमूद ८ बाबींव्यतिरिक्त इतर प्रकरणी (उदा.प्रवेशक्षमता वाढ/घट इ.) दिनांक २२.२.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्धारीत केलेले नोंदणी शुल्क विभागीय कार्यालयाकडे भरणा करुन प्रस्ताव सादर करावा.

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद नवी दिल्ली यांनी निर्धारित केलेल्या मानकांप्रमाणे संस्थेकडे पूर्णपणे सदय:स्थितीत वापरायोग्य सोयीसुविधा असतील तसेच समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेली व सक्षम प्राधिका-यांनी निर्गमित केलेली प्रमाणपत्रे उपलब्ध असतील तरच संस्थांनी आपले प्रस्ताव विभागीय कार्यालयांकडे सादर करावेत. तसेच शासनाची मान्यता/ शासनाचे ना हरकत प्रमाणपत्रासाठी प्रस्ताव सादर करण्यास विलंब झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबधित संस्थांची राहील याची नोंद घेण्यात यावी.

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक,तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत: सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई, नाशिक, पुणे, छत्रपती संभाजीनगर, अमरावती व नागपूर -त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक त्यांचे कार्यक्षेत्रातील विद्यमान AICTE या शिखर संस्थेच्या अधिपत्याखालील संस्थाना आपले स्तरावरुन अग्रेषित करावे.

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४६५/४७५/४९२/४४२/४४३
ई-मेल – desk2 @dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https:// dte.maharashtra.gov.in

तात्काळ

क्रमांक: २ /एनजीसी/ नवीन संस्था_अभ्यासक्रम/२०२५/ ९३८.                                        दिनांक : 12 NOV 2024

प्रति,

सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई,पुणे,नाशिक,छत्रपती संभाजीनगर,अमरावती,नागपूर

विषय: अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद नवी दिल्ली यांच्या मानकाप्रमाणे नवीन संस्था/नवीन अभ्यासक्रम इ. सुरू करण्याबाबतच्या प्रस्तावांची काटेकोरपणे तपासणी करून प्राधिकरणाच्या आवश्यकतेनुसार शासनाच्या ना हरकत प्रमाणपत्र /शासन मान्यतेकरिता संस्थांचे प्रस्ताव संचालनालयास सादर करणे बाबत..

संदर्भ: १) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद नवी दिल्ली यांच्या शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिताच्या मान्यता प्रक्रिये संदर्भातील अधिसूचना / जाहीर सूचना / परिपत्रके

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद नवी दिल्ली यांनी अधिसूचना / जाहीर सूचना / परिपत्रका द्वारे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीताच्या नवीन संस्था/अभ्यासक्रम इत्यादीच्या मान्यता प्रक्रियेसंदर्भातील अटी, शर्ती, मानके व मान्यता प्रक्रियेचे वेळापत्रक प्रसिद्ध केले आहे व त्या संबंधीचे Approval Process Handbook प्रसिद्ध केले आहे.

त्या अनुषंगाने कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद नवी दिल्ली यांच्या अखत्यारीतील नवीन संस्था / नवीन अभ्यासक्रमाचे धोरण ठरविण्याबात अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद या प्राधिकरणाच्या निकषांची काटेकोर तपासणी करून त्यांची पूर्तता करणाऱ्या संस्थांच्या प्रस्तावांची शिफारस प्राधिकरणाच्या आवश्यकतेनुसार शासनाच्या ना-हरकत प्रमाणपत्राकरीता तथा मान्यतेकरिता करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने आपल्या विभागात प्राप्त होणा-या नवीन संस्था/अभ्यासक्रम इत्यादीना शासनाचे ना हरकत प्रमाणपत्र/शासन मान्यता देण्यासंबंधीचे प्रस्तावावर खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद नवी दिल्ली यांच्या जाहिरातीस अनुसरून विना अनुदान तत्वावर पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर / पदविकोत्तर पदविका या स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था / महाविद्यालयातील विविध प्रस्तावांसाठी दिनांक २२.०२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये नोंदणी शुल्क निर्धारीत केलेले आहे. त्यानुसार आपल्याकडे प्राप्त होणा-या प्रस्तावांच्या अनुषंगाने नोंदणी शुल्क संस्थेकडून जमा करुन घेण्यात यावे. ज्या संस्था नोंदणी / तपासणी शुल्क भरणार नाहीत, अशा संस्थाच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही व

त्यास संबंधित संस्था / ट्रस्ट सर्वस्वी जबाबदार राहील याची आपल्या स्तरावरुन संबंधितांना जाणीव करुन देण्यात यावी.

२. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेचे APH २०२४-२७ मधील तरतुदीनुसार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेस खालील प्रस्तावांसाठी आवश्यकतेनुसार शासन ना-हरकत प्रमाणपत्र / शासन मान्यता द्यावयाची आहे. करिता, या प्रस्तावांसाठी त्रिसदस्यीय समिती गठित करून समिती मार्फत प्रत्यक्ष तपासणी करुन आपले अभिप्रायासह संचालनालयास तात्काळ सादर करण्यात यावेत.

अ) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या अखत्यारीत येणा-या अभ्यासक्रम/संस्थांकरिता

| अ.क्र. | अर्जाचा प्रकार |
|---|---|
| १ | नविन तांत्रिक संस्था सुरु [Setting up a new Technical Institution] |
| २ | संस्था बंद करून तेथे नवीन व्यावसायिक अभ्यासक्रमाची संस्था सुरू करणे<br>[Institution applied for Closure of the Institution for starting of a new Technical Institution in the same premises in the same year] |
| ३ | पदविका पातळीच्या संस्थेचे पदवी पातळीच्या संस्थेत रुपांतरण आणि त्याउलट करणे.<br>[Conversion of Diploma Level into Degree Level and vice-versa] |
| ४ | विद्यमान संस्थेत नवीन विद्याशाखा (Programme) / स्तर (Level) सुरू करणे.<br>[To start New Programme / Level in the existing Institutions] |
| ५ | साईट / लोकेशन मध्ये बदल करणे.[ Change of Site / Location] |
| ६ | संस्था बंद करणे [Closure of the Institution] |
| ७ | महिला संस्थेचे को-एज्युकेशन मध्ये परिवर्तन व त्याउलट<br>[Conversion of Women's Institution into Co-ed Institution and vice-versa] |
| ८ | ट्रस्ट / सोसायटी / कंपनीच्या नावात/ पत्त्यात बदल करणे<br>[Change in the Name / Address of the Trust / Society / Company] |

३. परिच्छेद क्रमांक २ मध्ये नमूद केलेल्या प्रस्तावांची तपासणी करण्यासाठी आपल्या स्तरावर त्रिसदस्यीय तपासणी समिती नेमण्यात यावी. सदर समितीमध्ये **स्थापत्य अभियांत्रिकी किंवा उपयोजित यंत्रशास्त्र किंवा आर्किटेक्चर विभागातील विभाग प्रमुख/प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक अशा एका सदस्याचा समावेश करण्यात यावा** व सदर समितीने अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेचे APH २०२४-२७ मधील मानकांप्रमाणे जमिनीचे सर्व संबंधित कागदपत्रे, उदाहरणार्थ ७/१२ चा उतारा, सर्वे नं., बिगरशेती प्रमाणपत्र, लँड युज सर्टिफिकेट, सक्षम प्राधिका-याने प्रमाणित केलेले बांधकाम नकाशे, बांधकाम परवाना, बांधकाम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र, भोगवटा प्रमाणपत्र, अग्नी व सुरक्षा प्रमाणपत्र, स्ट्रक्चरल ऑडिटरचे प्रमाणपत्र इ. सर्व कागदपत्रांची पडताळणी संबंधित मूळ कागदपत्रावरुन प्रत्यक्ष करावी. त्यानुसार संबंधित जागा, इमारत, बांधकाम, निधी, यंत्रसामुग्री व इतर सोयी-सुविधा अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेचे APH २०२४-२७ मध्ये निर्धारीत केलेल्या विहित केलेल्या मानकानुसार सदर सोयी-सुविधा उपलब्ध असल्याबाबत तपासणी करुन समितीच्या व आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह या संचालनालयास सादर करण्यात यावेत.

४. कोणत्याही परिस्थितीत अपुर्ण, त्रुटीयुक्त प्रस्ताव पाठविण्यात येऊ नयेत. अपुर्ण / त्रुटीयुक्त प्रस्ताव असल्यास तात्काळ आपले स्तरावरुन संबंधित संस्थेस त्याबाबत लेखी कळवून आपले स्तरावरुन निकाली काढण्यात यावेत. तसेच कोणत्याही प्रस्तावाबाबत कागदपत्र सादर करणे किंवा अन्य अटींच्या अधिन राहून शिफारशी सादर न करता फक्त परिपुर्ण प्रस्ताव आपल्या स्वयंस्पष्ट शिफारशीसह सादर करण्यात यावेत.

५. उपरोक्त प्रस्ताव या कार्यालयाकडे पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित करतांना परिपुर्ण प्रस्तावच संचालनालयास सादर करण्यात येतील याची दक्षता घ्यावी.अखिल भारतीय तंत्र शिक्षण नवी दिल्ली यांनी निर्धारित केलेल्या मानकांप्रमाणे संस्थेकडे पूर्णपणे सदय:स्थितीत वापरायोग्य सोयीसुविधा असतील तसेच समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेली व सक्षम प्राधिका-यांनी निर्गमित केलेली प्रमाणपत्रे उपलब्ध असतील तरच आपल्या व समितीच्या स्वयंस्पष्ट अभिप्रायांसह व शिफारशीसह प्रस्ताव शासन मान्यतेस्तव संचालनालयास सादर करावा. शासन विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या सुविधांबद्दल सजग असून संचालनालय स्तरावर किवा शासनस्तरावर प्रस्तावामध्ये कांही त्रुटी / वावगे आढळल्यास आपणास व समिती सदस्यांना व्यक्तिशः जबाबदार ठरविण्यात येईल याची नोंद घ्यावी व ही बाब समिती सदस्यांच्या आदेशात नमूद करून त्यांच्याही निदर्शनास आणून देण्यात यावी.

कोणत्याही परिस्थितीत अपूर्ण व त्रुटी असलेले प्रस्ताव मान्यतेस्तव सादर करु नयेत याची दक्षता घ्यावी.

प्राप्त प्रस्तावांबाबत आपले स्तरावरुन कार्यवाही झाल्यानंतर संबंधित संस्थांचे प्रस्ताव, तपासणी अहवाल आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह पदविका अभ्यासक्रमाचे प्रस्ताव कार्यासन क्रमांक १० आणि पदवी तसेच पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे प्रस्ताव कार्यासन क्रमांक २ कडे खास दुतामार्फत या संचालनालयास निश्चितपणे व तात्काळ उपलब्ध करुन द्यावेत.

(डॉ.विनोद मोहितकर)
संचालक,तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत : संचालक,महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ ,मुंबई यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी